# पोलीस मुख्यालयात पोलीस स्मृतीदिन साजरा





परभणी / प्रतिनिधी

शहरातील पोलीस मुख्यालयात सोमवारी (दि.२१) सकाळी आयोजित कार्यक्रमात पोलीस स्मृतीदिन साजरा करण्यात आला. यावेळी भारत - चीन युध्दात शहीद झालेल्या आणि कर्तव्य बजावताना धारातीर्थी पडलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना विशेष परेडद्वारे आदरांजली वाहण्यात आली.

२१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी हिमालयाच्या बर्फाळ प्रदेशात भारत, चीन सीमेवर गस्त घालणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस दलातील १० जवानांच्या तुकडीवर चीनी सैनिकांनी अचानक हल्ला केला. हॉट स्प्रिंग येथे झालेल्या या हल्ल्यामध्ये देशाचे सीमेचे रक्षण करतांना या १० शूरवीरांना वीरगती प्राप्त झाली होती. तेव्हापासून या वीरगती जवानांच्या स्मरणार्थ दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस आपल्या देशामध्ये पोलीस स्मृतीदिन म्हणून साजरा जातो. यावेळी वर्षभरातील काळात आपले कर्तव्य बजावताना धारातीर्थी पडलेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना या दिवशी विशेष पोलीस परेडचे आयोजन करून आदरांजली वाहण्यात आली. २०१८-१९ या कालावधीत आपले कर्तव्य बजावीत असताना भारतातील विविध दलामधील एकूण २५२, आणि महाराष्ट्रातील १० असे एकूण २६२ जवान शहीद झालेले आहेत. या शहीद झालेल्या अधिकारी, कर्मचारी यांच्या नावाचे वाचन सहाय्यक पोलीस निरीक्षक देवकते व कल्पना राठोड यांनी आज वाचन केले तर २० जवानांनी हवेत तीन फैऱ्या झाडून सलामी दिली. तर राखीव पोलीस निरीक्षक रवींद्र दामोदर व राखीव पोलीस उप निरीक्षक प्रकाश राठोड यांनी मानवंदना दिली. पोलीस अधीक्षक कृष्णकांत उपाध्याय, पोलीस अधीक्षक गृह मुंडे, पोलीस निरीक्षक प्रवीण मोरे यांनी शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाचे वेळी श्वान पथक, बिनतारी निरीक्षक सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पांढरे, पोलीस हवालदार शिरसाठे, रशीद मास्टर, पोलीस नायक शकील चव्हाण, राजेश कानगोडे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.